जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 FEB 2020

तरुण भारत


# भाषा अभ्यासकांना रोजगाराच्या अनेक संधी

## प्रा. शिवाजी जाधव : केएमसी महाविद्यालयात हिंदी भाषा आणि रोजगार विषयावर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजच्या सोशल मीडियाच्या जमान्यामध्ये भाषेच्या जानकारांची गरज आहे. डिजिटल अन् सोशल मीडियामध्ये भाषेच्या अभ्यासकांना रोजगारांच्या अनेक संधी असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता आणि जनसंपर्क विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

ते यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत आयोजित 'हिंदी भाषा आणि रोजगार' या



विषयावरील कार्यशाळेत प्रमुख उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत नागावकर होते.

डॉ. जाधव यांनी कंटेंट रायटर, व्हिडीओ ईडिटर, फीचर रायटर, डिजिटल मॅनेंजर इत्यादी विविध रोजगारांविषयी विस्तृत माहिती दिली.

डॉ. नागावकर म्हणाले, आजचा युवा सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिव्यक्त होऊ पाहत आहे. यासाठी त्याला भाषेचे उत्तम ज्ञान असणे गरजेचे आहे. यामुळे त्याची जागतिक पातळीवर छाप पडत आहे. पहिल्या सत्रात विवेकानंद कॉलेजचे प्रा. डॉ. दीपक तुपे यांनी पत्रकारिता क्षेत्रामधील पत्रकार ते संपादक, भाषांतरकार, मुद्रित शोधक इत्यादी रोजगारांबाबत व्यापक माहिती दिली. दुसऱ्या सत्रामध्ये आष्टा येथील आटर्स अँड कॉमर्स कॉलेजचे प्रा. विकास पाटील यांनी राजभाषा अधिकारी, दुभाषिया, स्टेनोग्राफर, लेखक, शिक्षक इत्यादी विविध क्षेत्रामधील संधीची माहिती दिली.

प्रास्ताविक अग्रणी महाविद्यालयीन योजनेचे समन्वयक प्रा. पी. डी. तोरस्कर यांनी केले. पाहुण्याचा परिचय हिंदी विभाग प्रमुख प्रा. किरण भोसले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश मुंज यांनी केले. आभार डॉ. संजय कांबळे यांनी मानले. यावेळी प्रा. ए. डी. मुडे, प्रा. एस. टी. धुर्वे, प्रा. आर. आर. मांगले, विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलजन्य आजारांचे घटले प्रमाण

## आरोग्य केंद्राच्या तीन वर्षांच्या पाहणीतील निष्कर्ष, शुद्धीकरण प्रकल्पाचा झाला लाभ

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांत तीन वर्षांमध्ये पाण्यातून उद्‍भवणाऱ्या आजारांचे प्रमाण कमी झाले आहे. विद्यापीठातील आरोग्य केंद्राने केलेल्या पाहणीत तसा निष्कर्ष समोर आला आहे. फिल्टरेशनद्वारे करण्यात येत असलेला पाणी पुरवठा पथ्यावर पडल्याचे दिसत आहे.**

विद्यापीठातील विविध अधिविभाग, कार्यालये, कँटिन्स, वसतिगृहांत डिसेंबर २०१७ पासून सुमारे आठशे कॅनद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. ओपन थियटरसमोर पाणी शुद्धीकरणाचा प्रकल्प उभारला गेला आहे. तेथून पाणी शुद्ध करून ते कॅनद्वारे विद्यापीठात सर्वत्र पोचवले जाते. महापालिकेचे पाणी वापरणे बंद झाले असून, पाण्याच्या बाबतीत विद्यापीठ स्वयंपूर्ण झाले आहे. यापूर्वी महापालिकेच्या पाण्यावर विद्यापीठाला अवलंबून राहावे लागत होते.

शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यातून विद्यार्थ्यांतील जलजन्य अर्थात पाण्यामुळे होणारे आजार कमी झाले आहेत. कावीळ, टायफॉईड, जंतसह पोटाच्या विकारांवरील उपचारासाठी विद्यार्थी आरोग्य केंद्रात येत होते. तीन वर्षांत त्यांचे प्रमाण घटत असल्याचे



निदर्शनास आले आहे.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांची शुद्ध पाण्याची तक्रार होती. ती संपुष्टात आल्याचे दिसत आहे. कॅनमध्ये बेडूक आढळल्याने विद्यापीठ प्रशासनाने पाणी शुद्धीकरण केंद्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. कॅनमध्ये बेडूक जाणे संशयास्पद असून, हा खोडसाळपणा असल्याचा संशय प्रशासनाला आहे.

### जलजन्य आजारांचे वर्षनिहाय प्रमाण असे

| वर्ष | विद्यार्थी |
|---|---|
| २०१४-१५ | २६३ |
| २०१५-१६ | २२७ |
| २०१६-१७ | २०० |
| २०१७-१८ | १२५ |
| २०१८०१९ | १३५ |

### परिसर जलसमृद्ध

तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी पाण्याची गरज ओळखून तलावांची बांधणी केली. भाषाभवन, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या परिसरातील तलाव पाण्यासाठी उपलब्ध केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी त्यांच्या कारकीर्दीत तलावांकडे अधिक लक्ष दिल्याने तलाव पाण्याने समृद्ध झाले आहेत, शिवाय विद्यापीठातील पर्यटनस्थळ म्हणून त्यांचा विकास झाला आहे.

**विद्यार्थी बाहेरचे पाणी प्यायले तर त्यांना पोटाचे आजार होतात. विद्यापीठातील पाणी शुद्ध असल्याने आजारांचे प्रमाण कमी झाले आहे. गेल्या तीन वर्षांचा तसा अभ्यासही केला आहे.**

**- डॉ. व्ही. ए. रानडे,**

वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र, शिवाजी विद्यापीठ.



**कोल्हापूर : विद्यापीठात सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमालेत बोलताना प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील. प्रा. डॉ. जगन कराडे, प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी.**

# महात्मा फुले धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पाया घालणारे समाजसुधारक : प्राचार्य पाटील

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पाया घालणारे महात्मा फुले हे देशातील पहिले समाज सुधारक होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठ, समाजशास्त्र विभागामार्फत सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमालेत 'सत्यशोधक समाज व सामाजिक परिवर्तन' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. जगन कराडे होते. प्राचार्य पाटील म्हणाले, भारतीय समाजातील दैववाद, सनातन, ब्राह्मण्यवादाची परंपरा अन्यायकारक आहे. या परंपरेने भारतीय समाजाचे प्रचंड नुकसान झाले आहे. या सनातनी परंपरेच्या विरोधात महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून पुरोगामी विवेकवादी विचारांची पेरणी केली. आजसुद्धा देशाच्या सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी महात्मा फुले यांच्या विचारांची गरज आहे. प्रास्ताविक डॉ. प्रल्हाद माने यांनी केले. अभिजित पाटील यांनी आभार मानले. यावेळी कॉमर्स विभागाचे प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. अविनाश भाले उपस्थित होते.

# तंत्रज्ञानाचा वापर विवेकबुद्धीने करा

## डॉ. नांदवडेकर; घाळी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

गडहिंग्लज, ता. १४ : 'सध्याचे युग माहिती तंत्रज्ञानाचे आहे; पण तंत्रज्ञानाचा वापर विवेकबुद्धीने केला पाहिजे. ज्ञान मिळविण्याची आसक्ती बाळगायला हवी. कारण ज्ञानाने श्रीमंत झाला तरच समाजात महत्त्वाचे स्थान मिळवता येते,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

येथील डॉ. घाळी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. नांदवडेकर बोलत होते. संस्थेचे सहसचिव गजेंद्र बंदी अध्यक्षस्थानी होते. महाविद्यालयाचे सभागृहात हा कार्यक्रम झाला.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी नेहमी नावीन्यपूर्ण संकल्पना राबविल्या पाहिजेत. महाविद्यालयीन जीवनापासून संशोधन वृत्ती जोपासायला हवी. विविध कार्यशाळामधून स्वत:मध्ये कृतिशीलता आणली पाहिजे. त्यातून स्वत:चे वेगळेपण दाखवून देता आले पाहिजे.''

प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी स्वागत केले. डॉ. नागेश मासाळ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमात गुणवत्ताप्राप्त ८० विद्यार्थ्यांसह पालक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. आरती भालेकर, भावेश शिंदे, रणजित कागनकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मिलिंद पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2020
तरुण भारत

# विद्यापीठात बीजगणितावर सेमिनार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागात दोन दिवसीय 'नॅशनल सेमिनार ऑन अल्जेब्रा' सेमिनारचे उद्घाटन शुक्रवारी आंध्र विद्यापीठाचे माजी गणित विभागप्रमुख प्रा. यु. एम. स्वामी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील होते. पाटील यांनी पदार्थविज्ञानातील गणिताचे महत्व विषद केले.

सेमीनारमध्ये पहिल्या दिवशी प्रा. एच. व्ही. कुंभोजकर, प्रा. बी. एन. वाफारे, प्रा. अनंतनारायण हरिहरन, प्रा. सुरेंद्र रेड्डी नांदेड यांनी बीजगणितामधील विविध संकल्पना उदाहरणासहित स्पष्ट केल्या. शनिवारच्या पहिल्या सत्रात संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक शोधनिबंध सादर करतील. दुसऱ्या सत्रात प्रा. मीनाक्षी निंभोरकर, प्रा. सी. एस. मांजरेकर यांची व्याख्याने होणार आहेत. तिसरे सत्र माजी गणित विभागप्रमुख स्वर्गीय वाय. एस. पवार यांना समर्पित करण्यात आले आहे. प्रा. एस. के. निंभोरकर हे प्रा. वाय. एस. पवार यांच्या गणितातील योगदानावर भाष्य करतील.

# विद्यापीठ स्वयंअध्ययन अहवाल तयार

म. टा. प्रतिनिधी,कोल्हापूर

राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेतर्फे (नॅक) शिवाजी विद्यापीठाकडून सादर केला जाणाऱ्या नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडेशन कौन्सिल या प्रक्रियेअंतर्गत स्वयंअध्ययन अहवाल तयार झाला आहे. आज १५ रोजी हा अहवाल विद्यापीठामार्फत सादर केला जाणार आहे. नॅक मूल्यांकनातील हा महत्त्वाचा भाग असून अहवाल सादरीकरणानंतर नॅक मूल्यांकनाची तारीख जाहीर करण्यात येणार आहे.

वर्णनात्मक व संख्यात्मक पद्धतीने हा अहवाल देण्यात येणार आहे. अभ्यासक्रम,अध्ययन, अध्यापन संशोधन सामंजस्य करार, शोधनिबंध, पुस्तकांचे प्रकाशन व समाजाभिमुख भूमिका या निकषावर हा अहवाल तयार करण्यात आला आहे. विद्यापीठाची आजवरची कामगिरी संख्यात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने मांडण्यात आली असून हा अहवाल ऑनलाइन सादर



केल्यानंतर तो पोर्टलवर प्रदर्शित होणार आहे. या अहवालानुसार पीआरटीम विद्यापीठाची पाहणी करणार आहे. नॅककडून विद्यार्थ्यांचे विद्यापीठातील शैक्षणिक सुविधाविषयी ऑनलाइन सर्व्हेक्षण होणार आहे. शिवाय विद्यापीठाने संख्यात्मक पद्धतीने ज्या गोष्टी भरल्या आहेत त्याची पडताळणीही करण्यात येणार आहे.

## आता लक्ष्य नॅक मूल्यांकन

एसएसआर अहवाल या महत्त्वाच्या प्रक्रियेसाठी गेल्या सात महिन्यांपासून विद्यापीठाच्या प्रशासकीय व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे काम सुरू होते. हा अहवाल सादर करण्याचा अंतिम दिवस १५ फेब्रुवारी असल्याने आता अहवाल सादर झाल्यानंतर मार्चमध्ये नॅक मूल्यांकनाची तारीख निश्चित होणार आहे.

# रेडिओ विश्वासार्ह माध्यम

कोल्हापूर टाइम्स टीम

'रेडिओ हे माध्यम अत्यंत विश्वासार्ह आहे. समाजातील सर्व घटकांना जोडून घेण्याची क्षमता या माध्यमात आहे. त्यामुळे रेडिओचा सर्वदूर प्रसार झाला आहे,' असे प्रतिपादन कोल्हापूर आकाशवाणी केंद्राच्या निवेदक निना मेस्त्री-नाईक यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात रेडिओ दिनानिमित्त आयोजित समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या.

निना मेस्त्री-नाईक म्हणाल्या, 'समाजाच्या विकासात रेडिओ माध्यमाचे मोठे योगदान आहे. विशेषतः आकाशवाणीचा भारतीय समाजमन तयार करण्यात मोठा वाटा आहे. आकाशवाणीची बातमीपत्रे अत्यंत विश्वासार्ह आहेत. नव्या आणि जुन्याचा संगम साधून आकाशवाणी वाटचाल करत आहे.'



**निना मेस्त्री-नाईक; पत्रकारिता विभागात रेडिओ दिन**

रेडिओ मिर्चीच्या कार्यक्रम प्रमुख अनया जमदग्नी म्हणाल्या, 'खासगी रेडिओ वाहिन्या तरुणांना केंद्रस्थानी ठेवून काम करतात. तरुणांची भाषा, त्यांच्या आवडीनिवडी जपण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी कमालीची नवनिर्मिती क्षमता हवी. या क्षेत्रात अलीकडे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे उत्तम करिअर म्हणून या क्षेत्राकडे पाहता येते.'

आर. जे. मनीष आपटे म्हणाले, 'वस्तुनिष्ठता हा रेडिओचा प्राण आहे. सत्य सांगणे ही एक जबाबदारी म्हणून हे माध्यम त्याकडे पाहते. समयसुचकता हे रेडिओ माध्यमांसाठी आवश्यक असणारे आणखी एक कौशल्य आहे.'

आर. जे. शीतल म्हणाल्या, 'रेडिओ माध्यमात श्रोत्यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. श्रोत्यांवर संशोधनही करणे गरजेचे आहे. रेडिओ माध्यम बदलत आहे. त्यामुळे या माध्यमांत काम करणाऱ्यांसमोरची आव्हानेही बदलत आहेत. डिजिटल कंटेंटमुळे येणाऱ्या काळात रेडिओही त्याच दिशेने जाईल. या दृष्टीने या माध्यमात काम करताना आपण सज्ज असले पाहिजे.'

डॉ. निशा पवार यांनी स्वागत व प्रस्ताविक केले. सोमदत्त देसाई यांनी सूत्रसंचालन केले. गौरव डोंगरे, निहारिका देशपांडे, कादंबरी भोसले, संदीप पाटील, कल्याणी अमनगी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, आनंदा पांढरबळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.